DAY — **11** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | VII | 07 | 1100 | J-423 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# BOOK KEEPING & ACCOUNTANCY (50)

**Time : 3 Hrs.** **(11 Pages)** **Max. Marks : 80**

**प्र. १. खालील सर्व उपप्रश्न सोडवा :** **[२०]**

**( अ )** खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून संपूर्ण वाक्य पुन्हा लिहा : (५)

(१) Tally या आज्ञावली (software) मध्ये कायम ठेव खाते ........ या गटात मोडते.

(अ) गुंतवणूक (ब) चल देयता

(क) बँक खाते (ड) चल संपत्ती

(२) विपत्राला स्वीकृती मिळण्यापूर्वी विपत्र ......... असते.

(अ) आदेश (ब) विनंती

(क) मसुदा (ड) साधन

(३) जर भागीदाराने एखादी संपत्ती ठेवून घेतली असेल तर .......... खाते नावे होते.

(अ) पुनर्मूल्यांकन (ब) भांडवल

(क) संपत्ती (ड) ताळेबंद

(४) इमारत निधीकरिता देणगी ही ........... आहे.

(अ) महसुली प्राप्ती (ब) भांडवली प्राप्ती

(क) भांडवली खर्च (ड) महसुली खर्च

(५) भारतीय भागीदारी कायदा ......... मध्ये अस्तित्वात आला.

(अ) १९३२ (ब) १८८१

(क) १९५६ (ड) १९८४

**(ब)** खालील विधानांसाठी प्रत्येकी एक योग्य शब्द / संज्ञा / शब्दसमूह लिहा : (५)

(१) भागांचे (shares) दर्शनी मूल्यावर निर्गमन.

(२) संस्थेच्या अनेक वर्षाच्या प्रतिष्ठेमुळे प्राप्त झालेले मूल्य.

(३) विनियोजित भांडवल $\frac{\text{(NRR)}}{\quad}$ = -----

(४) अशी प्राप्ती जी आवर्ती स्वरूपाची असते.

(५) अशी भांडवल पद्धती ज्यामध्ये भागीदारांचे भांडवल खाते स्थिर राहते.

**(क)** पुढील प्रश्नांची उत्तरे फक्त 'एका' वाक्यात लिहा : (५)

(१) भागीदाराच्या मृत्यू पर्यंतचा नफा कोणत्या खात्याला वर्ग केला जातो?

(२) विपत्राच्या शोधनासाठी सवलतीचे किती दिवस दिले जातात?

(३) नादार भागीदाराच्या भांडवल खात्यावरील तूट कोणाला सहन करावी लागते?

(४) प्रवेश शुल्क म्हणजे काय?

(५) पूर्व प्राप्त उत्पन्न म्हणजे काय?

**(ड)** खालील विधानांशी आपण सहमत आहात की असहमत आहात ते सांगा : (५)

(१) विसर्जनाच्या वेळी रोख / बँक खाते आपोआप बंद होते.

(२) वित्तीय विवरणात केवळ ताळेबंदाचा समावेश होतो.

(३) भागीदाराच्या निवृत्तीच्या वेळी त्यागाचे प्रमाण गृहीत धरतात.

(४) प्राप्ती-शोधन हे 'वास्तविक खाते' (Real Account) आहे.

(५) चालू खाते नेहमी नावे शिल्लक दर्शविते.

**प्र. २.** निशांत आणि योगेश ३ : १ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. **[ १० ]**

त्यांच्या ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे –

**ताळेबंद**

**३१ मार्च, २०२२ रोजीचा**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | हस्तस्थ रोख | | ३७,५०० |
| निशांत – | ७५,००० | | प्राप्य विपत्र | | ४५,००० |
| योगेश – | ८१,००० | १,५६,००० | ऋणको | ७५,००० | |
| राखीव निधी | | २४,००० | (–) संशयित कर्ज | | |
| धनको | | ४५,००० | निधी | ७,५०० | ६७,५०० |
| | | | फर्निचर / उपस्कर | | ३०,००० |
| | | | स्कंध | | ४५,००० |
| | | **२,२५,०००** | | | **२,२५,०००** |

त्यांनी हिश्श्याकरिता १ एप्रिल, २०२२ रोजी निहारीकाला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला :

(१) निहारीकाने भांडवल ₹ ६०,००० आणावे.

(२) निहारीकाने तिच्या हिश्श्याची ख्याती नगदी आणावी. ख्यातीचे मूल्य मागील ५ वर्षांच्या सरासरी नफ्याच्या ४ वर्षांच्या खरेदीच्या आधारे लावावे.

मागील पाच वर्षातील नफा :

२०१६–१७ ₹ ३०,०००

२०१७–१८ ₹ २२,५००

| | |
|---|---|
| २०१८-१९ | ₹ ३७,५०० |
| २०१९-२० | ₹ १५,००० |
| २०२०-२१ | ₹ २२,५०० |

(३) संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे केले गेले :
फर्निचर ₹ २२,५००, प्राप्य विपत्र ₹ ६०,०००, मालसाठा ₹ ३०,०००, संशयित कर्ज निधी ₹ १५,००० पर्यंत वाढवावा.

(४) वस्तू खरेदी केल्याबद्दल दिलेल्या विपत्राची स्वीकृतीची नोंद पुस्तकात करायची राहून गेली – ₹ ७,५००.

तयार करा :

(अ) पुनर्मूल्यांकन खाते

(ब) भागीदारांची भांडवल खाती

(क) नवीन संस्थेचा ताळेबंद

**किंवा**

रिद्धी, सिद्धी आणि कीर्ती हे भागीदार आहेत. ते नफा-तोटा अनुक्रमे ३ : १ : १ प्रमाणात विभागून घेतात. त्यांचा ३१ मार्च, २०२० रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे :

**ताळेबंद**

**३१ मार्च, २०२० रोजीचा**

| **देयता** | **रक्कम (₹)** | **संपत्ती** | **रक्कम (₹)** |
|---|---|---|---|
| धनको | ४५,००० | मोटार ट्रक | १,१०,००० |
| देय विपत्र | ३०,००० | यंत्र व संयंत्र | ४०,००० |
| सामान्य संचिती | ५५,००० | इमारत | ८०,००० |
| भांडवल खाते : | | पशुधन | ५५,००० |
| रिद्धी | १,३०,००० | ऋणको | ६५,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| सिद्धी | १,०५,००० | आत्मधृत संपत्ती | ५२,५०० |
| कीर्ती | ५५,००० | बँक | १७,५०० |
| | **४,२०,०००** | | **४,२०,०००** |

१ एप्रिल, २०२० रोजी कीर्ती भागीदारीतून खालील अटींवर निवृत्त झाली :

(१) ख्यातीचे पुनर्मूल्यांकन ₹ ५०,००० करण्यात आले. ख्यातीची रक्कम व्यवसायातच ठेवावी.

(२) संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे होते :
ऋणको– ₹ ५७,०००, पशुधन– ₹ ६५,०००, इमारत– ₹ ८२,०००,
यंत्र व संयंत्र– ₹ ४१,०००, मोटार ट्रक– ₹ १,००,०००.

(३) रिद्धी आणि सिद्धीयांनी अनुक्रमे ₹ ५५,००० आणि ₹ ३०,००० अतिरिक्त भांडवल नेट बँकिंगच्या माध्यमाने आणले.

(४) कीर्तीला द्यावयाची राशी तिच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करा.
नवीन संस्थेच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी लिहा.

**प्र. ३.** विराट, रोहित आणि हार्दिक २ : २ : १ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांनी ३१ मार्च, २०२१ रोजी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले, जेव्हा त्यांची स्थिती खालीलप्रमाणे होती. **[१०]**

**ताळेबंद**
**३१ मार्च, २०२१ रोजीचा**

| **देयता** | **रक्कम (₹)** | **संपत्ती** | **रक्कम (₹)** |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | इमारत | १,५६,००० |
| विराट | ५२,००० | फर्निचर / उपस्कर | ९०,००० |
| रोहित | ४४,००० | ख्याती | ७०,००० |
| हार्दिक | ३६,००० | ऋणको | ४०,००० |
| धनको | २,४०,००० | बँक | १६,००० |
| | **३,७२,०००** | | **३,७२,०००** |

वरील तारखेला भागीदारीचे विसर्जन झाले आणि भागीदारीच्या संपत्तीच्या रोखीकरणाचा परिणाम खालील प्रमाणे :

(१) इमारत ₹ ८०,०००, फर्निचर ₹ ६०,०००, ऋणको ₹ २०,०००.

(२) रोखीकरण खर्च ₹ ४,००० आला.

(३) सर्व भागीदार नादार म्हणून घोषित झाले. विराटकडून ₹ ४,००० व रोहितकडून ₹ ४,००० वसूल झाले.

वरील खाती बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.

**किंवा**

१ एप्रिल, २०२२ रोजी दिशाने प्रियाला ₹ ५०,००० किंमतीचा माल विकला. त्याच तारखेला दिशाने ३ महीने मुदतीचे काढलेले विपत्र प्रियाने स्वीकारले.

३० जून, २०२२ रोजी प्रियाने दिशाला विपत्र नूतनीकरणाची विनंती केली.

दिशा या अटीवर सहमत झाली की प्रियाने ₹ २०,००० रोखीने द्यावे आणि शेष रकमेवर ₹ ६०० व्याज समाविष्ट असलेले असे नवीन विपत्र स्वीकारावे.

दिशाने काढलेल्या शेष रकमेचे व्याजासहित दोन महीने मुदतीचे नवीन विपत्र प्रियाने स्वीकारले.

नवीन विपत्राचे देय तिथीला प्रियाने शोधन केले.

दिशाच्या पुस्तकात आवश्यक कीर्दनोंदी आणि प्रियाचे खाते तयार करा.

**प्र. ४.** धीरज, सूरज आणि लीना भागीदारी संस्थेचे भागीदार आहेत. ते अनुक्रमे २ : १ : १ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता : **[८]**

**ताळेबंद**
**३१ मार्च, २०२२ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | स्कंध | १७,००० |
| धीरज २३,००० | | फर्निचर | १८,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| सूरज ₹ १५,००० | | जमीन व इमारत | १६,००० |
| लीना १२,००० | ५०,००० | बँक | ३७,००० |
| धनको | २२,००० | | |
| सामान्य संचिती | १६,००० | | |
| | **८८,०००** | | **८८,०००** |

दिनांक ३० जून, २०२२ रोजी लीना मृत झाली आणि भागीदारीच्या करारानुसार खालील समायोजना करण्यात आल्या :

(१) स्कंध, फर्निचर आणि जमीन व इमारत यांचे पुनर्मूल्यांकन ₹ १६,७००, ₹ १६,२००, ₹ ३०,१०० ला अनुक्रमे करण्यात आले.

(२) संस्थेची ख्याती मागील चार वर्षाच्या सरासरी नफ्याच्या तीन वर्षीच्या खरेदीला आधार बनवून आणि ख्यातीतील लीनाचा हिस्सा ठरविण्यात यावा.

मागील चार वर्षाचा नफा :

| वर्ष | नफा ₹ |
|---|---|
| I | ३०,००० |
| II | २५,००० |
| III | २५,००० |
| IV | ४०,००० |

(३) लीनाचा नफ्यातील हिस्सा मागील वर्षाच्या नफ्यातून तिच्या मृत्यू दिनांका पर्यंत देण्यात यावा.

(४) भांडवलावर वार्षिक १०% दराने व्याज देण्याची तरतूद आहे.

(५) लीनाच्या मृत्यूपर्यंत तिची उचल ₹ २,७०० होती.

तयार करा :

(अ) लीनाचे भांडवल खाते

(ब) लीनाच्या ख्यातीचा हिस्सा

(क) मृत्यूच्या तारखेपर्यंतचा लीनाचा नफ्यातील हिस्सा

**किंवा**

लेखांकन आज्ञावली संचाचे वर्गीकरण / प्रकार स्पष्ट करा.

**प्र. ५.** सरस्वती अँड सन्स लिमिटेड नागपूर, यांनी प्रत्येकी ₹ १० सम मूल्य (at par) असणाऱ्या ५०,००० सामान्य भागांच्या निर्गमना करिता अर्ज आमंत्रित केले. त्यावर खालील प्रमाणे प्रती भाग रकमा देय होत्या : **[८]**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ ३ |
| आवंटनावर | ₹ ३ |
| प्रथम आणि अंतिम याचनेवर | ₹ ४ |

५०,००० भागांकरिता अर्ज प्राप्त झाले व सर्वांना भागांचे वाटप करण्यात आले. सर्व येणे रकमा प्राप्त झाल्या केवळ ५,००० भागांकरिता प्रथम व अंतिम याचनेची राशी प्राप्त न झाल्यामुळे ते भाग जप्त करण्यात आले.

सरस्वती अँड सन्स लिमिटेडच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी लिहा.

**किंवा**

ओलम लिमिटेड यांच्या ताळेबंदाच्या आधारे ३१ मार्च, २०२१ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे:

**ताळेबंद**

**३१ मार्च, २०२१**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| सामान्य भाग भांडवल | ४,५०,००० | स्थिर संपत्ती | ४,५०,००० |
| अग्रहक्क भाग भांडवल | ४०,००० | गुंतवणूक | ७५,००० |
| राखीव आणि वाढावा | ७५,००० | चल संपत्ती | ३,६५,००० |
| सुरक्षित कर्ज | १,५०,००० | | |
| असुरक्षित कर्ज | १,००,००० | | |
| चल देयता | ७५,००० | | |
| | **८,९०,०००** | | **८,९०,०००** |

ओलम लिमिटेडच्या ताळेबंदाच्या आधारे ३१ मार्च, २०२१ रोजीचे सामान्य आकाराचे विवरण तयार करा.

प्र. ६. 'गजानन चॅरिटेबल हॉस्पिटल' यवतमाळ ने पुढील प्रमाणे माहिती पुरविली आहे. त्यावरून ३१ मार्च, २०२१ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा. [१२]

**ताळेबंद**

**१ एप्रिल, २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल निधी | ५,५०,००० | रुग्णालय उपकरणे | १,५२,००० |
| बँक कर्ज | ३,२५,००० | रुग्णवाहिका | २,००,००० |
| औषधांच्या | | इमारत | ५,२५,००० |
| बिलाचे देणे | | औषध साठा | २१,००० |
| बाकी | २५,००० | रोख शिल्लक | २,००० |
| | **९,००,०००** | | **९,००,०००** |

**प्राप्ती-शोधन खाते**

**३१ मार्च, २०२१ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम (₹) | शोधन | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| शिल्लक पुढे आणली : | २,००० | कर्मचाऱ्यांचा पगार | ४२,५०० |
| आजीवन सभासद शुल्क | १५,००० | डॉक्टरांना मानधन | २,००,००० |
| रुग्णालय प्राप्ती | | दुरुस्ती | ९,००० |
| (महसूल) | २,५५,२०० | फर्निचर | २२,५०० |
| वर्गणी | १,११,००० | सामान्य खर्च | ८,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | औषधी खरेदी (यामध्ये २०१९-२० ₹२०,००० समाविष्ट) | १,००,००० |
| | | शिल्लक पुढे नेली | १,२०० |
| | ३,८३,२०० | | ३,८३,२०० |

समायोजना :

(१) घसारा आकारा – इमारतीवर वार्षिक ५% दराने आणि रुग्णवाहिकेवर ₹ १५,०००.

(२) ३१ मार्च,२०२१ ला औषध साठ्याचे मूल्य ₹ ११,००० होते.

(३) आजीवन सभासद शुल्काचे भांडवलीकरण करा..

**प्र. ७.** राम आणि श्याम समान प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफा-तोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा. **[१२]**

**परीक्षा सूची / तेरीजपत्रक**

**३१ मार्च, २०२२**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| विमा | ३०,००० | भांडवल : | |
| जमीन आणि इमारत [१ जुलै, २०२१ रोजी ₹ ४०,००० ची वाढ] | १,००,००० | राम | १,००,००० |
| | | श्याम | १,००,००० |
| वेतन | १०,००० | १०% बँक कर्ज [१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेतलेले] | ६०,००० |
| निर्यात कर | ५,००० | | |

| | | | |
|---|---|---|---|
| भाडे | २,००० | व्याज | ३,००० |
| उपस्कर | ८०,००० | देय विपत्र | १६,००० |
| ऋणको | ५२,००० | | |
| | **२,७९,०००** | | **२,७९,०००** |

अतिरिक्त माहिती :

(१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ६९,०००.

(२) ढोबळ नफा ₹ ६९,०००.

(३) विमा १ एप्रिल, २०२१ पासून १५ महिन्यांकरिता दिला आहे.

(४) जमीन व इमारतीवर वार्षिक १०% दराने तसेच उपस्करावर ५% दराने घसारा आकारा.

(५) बुडीत कर्ज ₹ २,००० अपलेखित करून विविध ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

◆◆◆